Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor8.249
Peer Reviewed Journal
DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2410III01V12P0004

e-ISSN No. 2394-8426
Special Issue On
CPDE Oct'2024
Issue–III(III), Volume–XII

# छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा राष्ट्रीय संपादणूक सर्वेक्षण अहवाल २०२१ सद्य:स्थिती - एक अभ्यास

**संशोधक**
**श्री. जनार्दन कारभारी राऊत**
डी.एड्, एम.एड्,सेट (शिक्षणशास्त्र)

**प्रास्ताविक -**

विद्यार्थ्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागतो. यामध्ये पालकांची आर्थिक परिस्थिती, योग्य मार्गदर्शनाचा अभाव, पालकांचे अज्ञान,विद्यार्थ्यांची आवड, रुची याचा विचार न करता शाखा निवड, मित्रांनी निवडलेल्या शाखेत प्रवेश अशा अनेक कारणांचा समावेश शाखानिवड करतांना होत असतो. यातूनच विद्यार्थी या सर्व बाबींचा विचार करतात

देशाचे चित्र बदलायचे असेल तर शिक्षणावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. आपल्या देशातील सगळया नेत्यांना त्याची जाणीव आहे. परंतू आपला शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन चुकीचा आहे.आपण शिक्षणाकडे नोकरी मिळविण्याचे साधन म्हणून बघतो.मुलांच्या वृत्ती, प्रवृत्तीत आणि विचार करण्याच्या पध्दतीत बदल घडविण्याचे साधन म्हणून आपण बघतच नाही त्यामुळे आपल्या देशात शिक्षणाचे प्रमाण वाढले पण शिक्षणाचा पाहिजे तो प्रभाव वाढला नाही.

शिक्षणाकडे कौशल्य निरनिराळी कौशल्ये विकसित करण्याचे साधन म्हणून बघावे तर त्यांचे उददिष्ट साध्य होईल कारण देशाच्या नागरिकांमध्ये निरनिराळी कौशल्ये नसतील तर देशाचा विकास होणे शक्य नाही. ज्या ज्या देशांनी प्रगतीचे नवनवे शिखर पादाक्र ांत केले आहे. त्या देशांनी ते केवळ जनतेच्या कौशल्याच्या जोरावरच पादाक्रांत केले आहे. भारतीयांतही अशी कौशल्ये आहेत आणि ती विकसित करुन आपण अमेरिकेऐवढे पुढे जाऊ शकतो. तेवढी गुणवत्ता आपल्यात आहे हेच लोकांना माहित नाही. म्हणून देशातल्या तरुणांना अनेक प्रकारची कौशल्ये आत्मसात व्हावीत अशी शिक्षण व्यवस्था आपण राबवणार आहोत.

आपल्या देशातल्या सध्याच्या शिक्षणाला दिशा नाही.स्वातंत्र्यपूर्व काळात इंग्रजांनी भारतीय समाजातून चांगले कारकून मिळावेत म्हणून ही शिक्षण व्यवस्था सुरु केली आहे असे म्हटले जाते. पण दुर्दैवाची गोष्ट अशी आहे की, या शिक्षण व्यवस्थेतून चांगले कारकूनसुध्दा तयार होत नाहीत. खरे म्हणजे देशाची उभारणी दोन गोष्टींवर होत असते. शिक्षण आणि आरोग्य हे सर्वांना माहित असुन सुध्दा आपल्या देशामध्ये नेमक्या या दोन गोष्टींकडे दुर्लक्ष आहे. हे अक्षम्य दुर्लक्षच आपली प्रगती न होण्यामागे सर्वात मोठे कारण आहे.

शिक्षणक्षेत्रामध्ये एक मोठी विसंगती लक्षात येते. ती म्हणजे विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे किंवा आकलनाचे मूल्यमापन करण्याची चुकीची पध्दती आपण शिक्षणातून मुलांना हुशार बनवतो.किंबहूना तसा दावा करतो. परंतु त्यांच्या पूर्ण वर्षभरातल्या कामगिरीचे आकलन तीन तासाच्या उत्तरपत्रिकेवरुन करतो. या तीन तासातल्या कामगिरीवरच मुलांना गुणवत्तावान ठरवतो. खरे म्हणजे ही गुणवत्ता आकलनाची नसते. ती गुणवत्ता अन्य कोणत्याही गुणाची नसते तर ती केवळ स्मरणशक्तीची गुणवत्ता असते आणि याही गुणवत्तेच्या चुकीच्या मापानुसार ज्यांना ९० टक्के गुण मिळतात. त्यानां हुशार ठरवून त्यांच्यावर लक्ष केंद्रित केले जाते. मात्र ५०

DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2410III01V12P0004
e-ISSN No. 2394-8426
Special Issue On CPDE Oct'2024
Issue–III(III), Volume–XII

टक्कयांपासून ९० टक्क्यांपर्यंत गुण मिळवणा-या विद्यार्थ्यांकडे पूर्ण दुर्लक्ष केले जाते. ही मुले समाजाच्या देशाच्या काही उपयोगाचीच नाही असे मानून त्यांची उपेक्षा केली जात असते. या मुलांमध्ये घोकमपट्टी करुन उत्तरपत्रिका लिहिण्याचे कौशल्य नसेल परंतु यासाठी आवश्यक असणारी स्मरणशक्ती हेच काय जीवनाचे कौशल्य आहे का? जीवन यशस्वी करण्यासाठी अणि ते समाजाच्या उपयोगी ठरावे म्हणून माणसाच्या अंगी असलेल्या अनेक गुणांचा उपयोग होत असतो. स्मरणशक्ती चांगली आहे म्हणून एखादा माणूस जीवनातल्या काही कसोटीच्या प्रसंगातून पार पाडला असे काही अढळत नाही.

उलट निर्णय घेण्याची क्षमता, चांगले संवाद कौशल्य, कला, क्रिडा कौशल्य,नेतृत्व गुण हेही आवश्यक गुण आहेत आणि त्या गुणांच्या जोरावर अनेकांनी आपले आयुष्य सार्थकी लावले आहे. तसेच समाजालासुध्दा काहीतरी दिलेले आहे. म्हणून शाळांमध्ये मुलांच्या अंगी असलेल्या याही गुणांचा विकास करण्यासाठी योजना असली पाहिजे. जगातल्या अनेक शास्त्रज्ञांच्या चरीत्राकडे पाहिल्यास असे लक्षात येईल की ते सगळेच शास्त्रज्ञ केवळ अभ्यासात हुशार होते म्हणून शास्त्रज्ञ झाले असे काही घडलेले नाही. प्रचलित अर्थाने ज्या मुलांना हुशार म्हणत असतो. अशा हुशार मुलांत त्यांची गणना केली जात नव्हती. पण पुढे ते केवळ देशालाच नव्हे तर मानवतेला वळण लावणारे संशोधन करु शकले तेव्हा सगळया प्रकारच्या मुलांवर लक्ष केंद्रित करुन त्यांच्या अंगी असलेल्या कौशल्याचा विकास केला पाहिजे.

विद्यार्थ्यांना अध्यापन केलेल्या भागाचे आकलन होणे म्हणजेच अध्ययन निष्पत्ती होय. नासद्वारे (National Achievement Survey) होणाऱ्या मुल्यमापनामध्ये मुलांच्या वर्गनिहाय व विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती पडताळल्या जातात. २०२१ च्या नासच्या अहवालानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या बाबतीत झालेले सर्वेक्षण अतिशय महत्वपूर्ण आहे.

National Achievement Survey हा सर्व्हे NCERT तर्फे सरकारी व खाजगी शाळांचा केला जातो. या माध्यमातून ७०० हून अधिक जिल्ह्यांतील विद्यार्थ्यांचे अध्ययन निष्पत्ती तपासल्या जाते. नास द्वारे दर तीन वर्षांनी तिसरी, पाचवी, आठवी आणि दहावीच्या विद्यार्थ्यांच्या क्षमतांचे मुल्यांकन केले जाते. तिसरी आणि पाचवीच्या गणित आणि परिसर अभ्यास, आठवीसाठी गणित, विज्ञान आणि नागरिकशास्त्र आणि दहावीसाठी गणित, विज्ञान ,नागरिकशास्त्र आणि इंग्रजी या विषयांसाठी सर्व्हेक्षण केले जाते.

**उद्देश -**

१. विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पत्ती तपासणे.

२. विद्यार्थ्यांच्या क्षमता प्राप्तीतील अडथळयांचा अभ्यास करणे.

३. अध्ययन निष्पत्ती प्राप्तीतील अडथळयांवर उपाययोजना करणे.

४. अध्ययन निष्पत्ती प्राप्तीसाठी नविन ध्येयधोरणांची आखणी करणे.

**महत्त्व -**

१. शिक्षणाची पातळी सुधारण्यासाठी आणि नियोजन दिशा देण्यासाठी केंद्र व राज्य सरकारांना मदत होईल.

२. विद्यार्थ्यांच्या सामाजिक, भावनिक आणि संख्यात्मक विकासाच्या दृष्टिने त्यांना पद्धतशीरपणे आकलन करता येईल.

DOI link - https://doi.org/10.69758/GIMRJ/2410III01V12P0004
e-ISSN No. 2394-8426
Special Issue On CPDE Oct'2024
Issue–III(III), Volume–XII

३. शिक्षक क्षमता वाढण्यास मदत होईल.

**निष्कर्ष -**

नास हा अहवाल विद्यार्थ्यांच्या अध्ययन निष्पत्तीशी संबंधित आहे. नासद्वारे होणाऱ्या मुल्यमापनामध्ये मुलांच्या वर्गनिहाय व विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती पडताळल्या जातात. २०२१ च्या नासच्या अहवालानुसार छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या बाबतीत झालेल्या सर्वेक्षणाचे निष्कर्ष खालीलप्रमाणे आहे-

१. ८३ टक्के विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक यशासाठी पालकांचे सहकार्य मिळते.

२. ५६ टक्के विद्यार्थ्यांच्या घरी इंटरनेट कनेक्टीव्हिटी आहे.

३. ९३ टक्के शिक्षक वर्गात काय शिकवितात हे विद्यार्थ्यांना समजते.

४. ८० टक्के विद्यार्थी वर्गात शिक्षणाचे माध्यम म्हणून घरी तीच भाषा वापरतात.

५. ६४ टक्के विद्यार्थी खेळाच्या काळात बाहेर जावून खेळतात.

६. ९४ टक्के विद्यार्थ्यांना शाळेत जायला आवडते.

७. ७६ टक्के विद्यार्थ्यांना शळेत डिजीटल उपकरणे उपलब्ध आहेत.

८. १४ टक्के शाळेच्या इमारतींची महत्वपूर्ण दुरूस्ती आवश्यक असल्याचे शिक्षकांचे मत आहे.

९. ३१ टक्के अतिरीक्त कामाचा भार पडल्याचे शिक्षक सांगतात.

१०. ३८ टक्के शिक्षकांकडे पुरेसे शैक्षणिक साहित्य उपलब्ध आहे.

११. ६२ टक्के शाळांकडे पुरेशी दृकश्राव्य संसाधने उपलब्ध आहेत, असे मुख्याध्यापकांचे मत आहे.

१२. ४२ टक्के शाळांकडे पुरेशी ग्रंथालय संसाधने उपलब्ध आहेत, असे मुख्याध्यापकांचे मत आहे.

**शिफारशी -**

१. केंद्र आणि राज्याचे अनुदान ग्रामपंचायत निहाय आणि स्थानिक स्वराज्य संस्थानुसार एकत्र केले जावे.

२. केंद्र आणि राज्य सरकार हे १९७६ पासून शिक्षण हा समवर्ती सुचीतील विषय असल्याने दोहोंचाही संसासधनातील वाटा समान उचलायला पाहीजे.

३. विद्यार्थी गुणवत्ता वाढीसंदर्भात शालेय स्तरावर पालकांशी नियमित संवाद असणे गरजेचे आहे.

४. गावामध्ये सार्वजनिक ग्रंथालये विकसित करणे गरजेचे आहे. यामुळे गावातील विद्यार्थी अभ्यास करू शकतील आणि विद्यार्थी गुणवत्ता वाढ होईल.

५. शालेय पातळीवरील अपूर्ण भौतिक सुविधा पूर्ण करण्यासाठी शाळा जो निधी मागणी करेल तो त्यांना पुरविण्यात यावा.

**संदर्भ ग्रंथ -**

१. पंडित बन्सी बिहारी (२००५) शैक्षणातील संशोधन - नित्य नुतन प्रकाशन, पुणे

२. https://nas.gov.in/report-card/nas-2021

३. अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन वाचन साहित्य मुलभूत संकल्पना (२०२३) - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र राज्य पुणे